# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात कोरोना विषाणु (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या 'विशेष कोव्हिड उपचार केंद्रे' तसेच 'विविध रुग्णालये' येथे रुग्णसेवेसाठी निम-वैद्यकीय संवर्गातील पदे कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात ३ महिन्यांच्या कालावधीसाठी ठोक मानधन तत्त्वावर नियुक्ती करीता अर्हताप्राप्त उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| **व्यक्तिशः / ई-मेल व्दारे अर्ज सादर करावयाचा कालावधी** | **दि.१३.०७.२०२० ते दि. २४.०७.२०२० (सुट्टीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते संध्याकाळी ४.३० वाजेपर्यंत व्यक्तिशः सादर करावेत)किंवा अर्ज कागदपत्रांच्या / गुणपत्रिकांच्या / प्रमाणपत्रांच्या सर्व स्कॅन कॉपीसह ao03cms.ph@mcgm.gov.in या ई-मेल आयडी वर मेल करावेत. दि.२४.०७.२०२० रोजी संध्याकाळी ४.३० नंतर प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही** |
| **अर्ज सादर करण्याचे ठिकाण** | **प्रवैअ व खाप्र (माआसे) यांचे कार्यालय, ७ वा मजला, के. बी. भाभा मनपा सर्वसाधारण रुग्णालय, डॉ. आर. के. पाटकर मार्ग, बांद्रा (प.), मुंबई ४०००५०.** |

**'निम-वैद्यकीय' संवर्गातील कंत्राटी पध्दतीने भरावयाची पदे-**

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | मासिक ठोक मानधन |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ५१ | रु.३०,०००/- (प्रतिमाह) |
| २ | क्ष-किरण तंत्रज्ञ | ५२ | रु.३०,०००/- (प्रतिमाह) |
| ३ | ई.सी.जी. तंत्रज्ञ | ३९ | रु.३०,०००/- (प्रतिमाह) |
| ४ | औषधनिर्माता | ६१ | रु.३०,०००/- (प्रतिमाह) |

**'निम-वैद्यकीय' संवर्गातील कंत्राटी पदांसाठी शैक्षणिक अर्हता-**

**१. प्रयोगशाळा तंत्रज्ञ-**

(1) (अ) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील (Degree in B.Sc.) पदवी धारण करणारा असावा. आणि मान्यताप्राप्त विद्यापीठाची (**M.S.B.T.**) ची डी.एम.एल.टी.(**D.M.L.T.**) पदविका उत्तीर्ण असावा (B.Sc. + DMLT)

**किंवा**

उमेदवाराने 12वी ( H.S.C.) नंतर 'महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ' यांचेकडील 'निम-वैद्यकिय तंत्रज्ञान' या शाखेतील 'लॅबोरेटरी मेडीसीन' या विषयातील बीपीएमटी '(Bachelor of Paramedical Technology in Laboratory Medicine)' पदवी धारण करणारा असावा.

**२. क्ष-किरण तंत्रज्ञ**

उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विदयापीठामार्फत चालविला जाणारा क्ष – किरण विषयातील बी. पी. एम. टी. ( Bachlor in Paramedical Technology in Radiography ) 3 वर्षाचा पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा व त्याने 6 महिन्याचे इंटर्नशीप पूर्ण केलेली असावी. (प्रथम प्राधान्य)

**किंवा**

उमेदवार मान्यता प्राप्त विदयापीठाची विज्ञान शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा त्याचबरोबर मान्यताप्राप्त विदयापीठाची 'रेडीओग्राफी' ही पदवीका उत्तीर्ण झालेला असावा व डायग्नोस्टिक सेंटर / रुग्णालय येथला क्ष-किरण विषयक कामाचा १ वर्षाचा अनुभव असावा. (व्दितीय प्राधान्य)

**किंवा**

उमेदवार १२वी विज्ञान / १२वी (MCVC) आणि मान्यताप्राप्त विदयापिठाची रेडीओग्राफी पदविका (Diploma in Radiography)उत्तीर्ण असावा व डायग्नोस्टिक सेंटर / रुग्णालय येथल क्ष-किरण विषयक कामाचा २ वर्षाचा अनुभव असावा. (व्दितीय प्राधान्य)

**३. ई.सी.जी. तंत्रज्ञ**

उमेदवार १२वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा कारडिओ टेक्नोलॉजी विषयातील बी.पी.एम.टी. (Bachelor of Paramedical Technology in Cardio-Technology) ३-१/२ वर्षाचा पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा.

**४. औषध निर्माता**

1. उमेदवाराकडे राज्य शासनाच्या तंत्रशिक्षण मंडळाची 'फार्मसी' मधील पदविका **किंवा** मान्यताप्राप्त विद्यापीठाची 'फार्मसी' मधील पदवी असणे आवश्यक आहे. (पदवीस प्राधान्य देण्यात येईल).
2. उमेदवार महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिलकडे नोंदणीकृत असावा.

**वयोमर्यादा -**

उमेदवाराचे वय दि.०१.०७.२०२० रोजी १८ वर्षापेक्षा कमी व ५० वर्षापेक्षा अधिक असता कामा नये.

**वेतन:-**

सर्व पदांकरीता मासिक ठोक मानधन रु. ३०,०००/- ( तीस हजार फक्त ) प्रतीमाह.

**निवडीचे निकष :**

1. पदांच्या सेवा प्रवेश नियमानुसार विहित केलेली अर्हता/अटी/शर्ती धारण करीत असलेल्या उमेदवारांमधून अर्ज विहित कालावधीत मागविण्यांत येतील.
2. उमेदवारांनी अंतिम वर्षाच्या पदवी / पदविका परिक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या टक्केवारीनुसार निवड केली जाईल.
3. पदवी परिक्षा / पदविका एकापेक्षा जास्त प्रयत्नांत उत्तीर्ण केली असल्यास अंतिम वर्षाच्या पदवी परिक्षेत उमदेवारानी प्राप्त केलेल्या एकूण गुणांमधून प्रत्येक प्रयत्नांसाठी 10 गुण वजा केले जातील.
4. चार पेक्षा अधिक प्रयत्नांत (अंतिम वर्षात) पदवी परिक्षा / पदविका उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
5. समान गुण धारण करणा-या अर्हताधारक उमेदवारांना जन्म तारखेनुसार वयोज्येष्ठतेने प्राधान्य देण्यात येईल.

**सर्वसाधारण अटी व शर्ती –**

1. सदर जाहिरातीद्वारे उपलब्ध पात्र अर्जांमधून गुणवत्तेनुसार प्रत्येक पदासाठी सामाईक गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर आवश्यकतेप्रमाणे उमेदवारांना कंत्राटी पध्दतीने संबंधित 'विशेष कोव्हिड उपचार केंद्रे' येथे किंवा रुग्णालयात टप्प्या- टप्प्याने नियुक्त करण्यात येईल.

2. उपरोक्त पदांकरीता प्रथमतः ३ महिने किंवा कोरोना विषाणु (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव संपेपर्यंत जे आधी घडेल त्या कालवधीकरिता नियुक्तिपत्र देण्यात येईल. साथ कमी झाल्यास किंवा 'विशेष कोव्हिड उपचार केंद्रे' बंद करण्याचा निर्णय झाल्यास सदर नियुक्ति आपोआप संपुष्टात येईल. **त्यासाठी १ महिन्याची नोटीस दिली जाणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी.**

3. सदर उमेदवारांना ठोक मानधन रु.३०,०००/- प्रतिमाह, ८ तास दररोज कार्यरत कालावधीकरिता चक्रांकित पध्दतीने काम करावे लागेल व शासनाच्या मार्गदर्शन तत्त्वानुसार साप्ताहिक व पूरक रजा अनुज्ञेय असेल.

4. **उमेदवारास** मधुमेह / उच्च रक्तदाब / ह्दयविकार / कर्करोग / प्रतिकार शक्ति कमी होऊ शकणारे इतर आजार इत्यादी नसावेत.

5. पदाच्या आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. तथापि नियुक्त केलेल्या उमेदवारांना महापालिकेतील नोकरीवर हक्क सांगता येणार नाही. पुनर्नियुक्तीबाबत किंवा शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

6. जाहिरातींमध्ये दिलेल्या पदाची संख्या आवश्यकतेनुसार बदलण्यासापेक्ष आहे.

7. अर्ज विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात, सर्व दृष्टीने परिपूर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

8. क्षेत्रीय स्तरावर सामाजिक बांधिलकीने काम करण्याची आवड असावी तसेच शारीरीक दृष्ट्या काम करण्यास सक्षम असावा.

9. संबंधित पदासाठी आवश्यक संबंधित कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

10. उमेदवारांनी अर्जात आपले संपुर्ण नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, इमेल आयडी, जन्मदिनांक इत्यादीबाबतचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

11. सदरची नेमणुक कंत्राटी तत्त्वावर तात्पुरती असल्याने उमेदवारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुरूप करण्यात येणार आहे. याबाबत कोणतीही विचारणा दुरध्वनीवर करण्यात येऊ नये.

12. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

13. कंत्राटी पध्दतीने निवड झालेल्या उमेदवारांनी विहित नमुन्यातील वचनपत्र / शपथपत्र (Affidavit) भरुन देणे आवश्यक राहिल.

14. भरती प्रक्रियेदरम्यान कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित करण्याचे अधिकार मुंबई महानगरपालिका राखून ठेवीत आहे.

**<u>विशेष सूचना:-</u>**

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले / टपालाव्दारे सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज लिहीणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
2. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.
3. मध्यस्थ/ठग/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याचे आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सुचना देण्यात येत आहेत.
4. प्रशासकीय किंवा अन्य काराणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यांवर थांबविण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.
5. सदर जाहिरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध आहे. उमेदवाराने वेबसाइट उघडण्यासाठी Internet Explorer 6 अथवा त्या वरील आवृत्तीचाच वापर करावा.

**सही /-**

**प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख**
**(माध्यमिक आरोग्य सेवा)**

# अर्जाचा नमुना

## वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)

**पदाचे नावः** ----------------------------------------

| |
|---|
| उमेदवाराने त्यांचे अलिकडे काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून फोटोवर स्वाक्षरी करावी<br><br>२.५ से.मी. X ३ सें.मी. |

1. (अ) संपूर्ण नांव (आडनांव प्रथम ) (मराठीत) : ---------------------------------------------

   (In English) ..........................................

   (ब) वडिलांचे /पतीचे संपूर्ण नांव : ---------------------------------------------

   (क) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता ) : ---------------------------------------------

2. पत्ता : ----------------------------------------------------------

   ----------------------------------------------------------

   दूरध्वनी क्रमांक. ----------------------------------------------------------

   ई-मेल - ----------------------------------------------------------

3. लिंग : पुरुष ☐ स्त्री : ☐

4. जात ------------------- पोटजात :------------------- प्रवर्ग : -------------------

5. अ) जन्मदिनांक : :- दिनांक महिना वर्ष

| दिनांक | | महिना | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

   ब) दि. ०१.०७.२०२० रोजी असलेले वय --------------वर्षे ------------महिने ------------- दिवस

6. **शैक्षणिक अर्हता :-**

| शैक्षणिक अर्हता | शालांत परिक्षा मंडळ / विद्यापीठाचे नांव | गुणांचा तपशील | | | शालांत परिक्षेतील गुण | | **एकूण प्रयत्न** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त | पैकी | टक्केवारी | मराठी | | |
| एस.एस.सी. | | | | | | | |
| एच.एस.सी. | | | | | | | |
| पदवी | | | | | | | |
| पदविका | | | | | | | |
| महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिल नोंदणी क्रमांक ---------------------------------------------------------------------------<br>(औषध निर्माता पदाकरीता) | | | | | | | |
| | | | | | | | |

7. संगणकविषयक ज्ञान : MS-CIT किंवा शासनाने विहित : आहे/नाही

केलेल्या संगणविषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र

8. अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? - होय / नाही

ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची

प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी

9. उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का ?

असल्यास तपशील दयावा. : ———————————————————-

10.उमेदवार सध्या नोकरी करीत आहे का? असल्यास त्याबाबतचा तपशील: होय/नाही

-------------------------------------------------------------------------------------------

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/ करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेस विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी ........................................ पदाकरीता पात्र आहे. वरीलपैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी कंत्राटी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार रहाणार नाही. अर्जाव्दारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

आपला / आपली विश्वासू,

दिनांक : अर्जदाराची सही/-

ठिकाण : (अर्जदाराचे नाव)

सोबत:- 1)

2)

3)

4)